TATA

# टाटा केमिकल्स लिमिटेड,

कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर: एल२४२३९एमएच१९३९पीएलसी००२८९३
नोंदणी कार्यालय: बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४०० ००१
फोन क्र.: ०२२ ६६६५ ८२८२, फॅक्स क्र.: ०२२ ६६६५ ८१४४
ईमेल: investors@tatachemicals.com, वेबसाईट: www.tatachemicals.com

## विशेष सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-मतदानाची माहिती

सूचना याद्वारे देण्यात येते की, २२ नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या सभेत संचालक मंडळाने कंपनीच्या पूर्णदिय भागभांडवलाच्या १९.३५% धारण केलेल्या अशा टाटा केमिकल्स लिमिटेडच्या अधिग्रहणावरील टाटा सन्स लिमिटेड ('कंपनी') च्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा (इजीएम) बोलाविण्याचे ठरविले आहे. इजीएम ही इजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या व्यवसायाचा व्यवहार करण्यासाठी बिर्ला मातुश्री सभागर, १९, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मुंबई-४०० ०२० येथे शुक्रवार, २३ डिसेंबर, २०१६ रोजी दु. ३.०० वा. भाप्रवे. घेण्यात येणार आहे. इजीएमच्या सूचनेसह अटेंडन्स स्लिप, प्रतिपत्री प्रपत्र हे डिपॉझिटरीजकडे उपलब्ध किंवा कंपनीकडे नोंदणीकृत ई-मेल पत्त्यावर ई-मेल करण्यात आले आहेत. इजीएमच्या सूचनेच्या प्रत्यक्ष प्रतीसह अटेंडन्स स्लिप, प्रतिपत्री प्रपत्र हे त्यांचे ई-मेल पत्ते न नोंदविलेल्या सभासदांना परवानगी असलेल्या पध्दतीने पाठविण्यात आले आहेत. कंपनीने २८ नोव्हेंबर, २०१६ रोजी सभासदांना ई-मेल करणे तसेच पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे. इजीएमची सूचना कंपनीची वेबसाईट www.tatachemicals.com वर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) ची वेबसाईट http://www.evoting.nsdl.com वर उपलब्ध आहे.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ आणि वेळोवेळी केलेल्या सुधारणेनुसार त्या अंतर्गत स्थापित नियम आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ४४ अनुसार सभासदांना नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) द्वारे पुरविलेल्या इजीएमच्या ठिकाणाच्या व्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान पध्दत वापरून ('दूरस्थ ई-मतदान') इजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या ठरावांवर त्यांचे मतदान करण्याची सुविधा पुरविण्यात आली आहे आणि अशा मतदानाने व्यवसायाचा व्यवहार करता येईल.

मतदानाचे हक्क कट ऑफ तारीख म्हणजेच १६ डिसेंबर, २०१६ रोजीस भागधारणेच्या आधारे राहतील. कोणीही व्यक्ती जी कट ऑफ तारखेस कंपनीची सभासद आहे ती दूरस्थ ई-मतदान वापरून इजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या सर्व ठरावांवर मतदान करण्यासाठी किंवा इजीएममध्ये मतदान करण्यासाठी हक्कदार राहतील.

दूरस्थ ई-मतदानाचा कालावधी मंगळवार, २० डिसेंबर, २०१६ रोजी स. ९.०० वा. भाप्रवे सुरु होईल आणि गुरुवार, २२ डिसेंबर, २०१६ रोजी सायं. ५.०० वा. भाप्रवे संपेल. सदर कालावधी दरम्यान सभासद इलेक्ट्रॉनिकली त्यांचे मतदान करू शकतात. दूरस्थ ई-मतदान मॉड्युल त्यानंतर एनएसडीएलद्वारे बंद करण्यात येईल.

सभासदाने ठरावावर एकदा केलेल्या मतदानात त्यानंतर सभासदाला बदल करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

इलेक्ट्रॉनिक मतदान पध्दत किंवा बॅलट पेपर मार्फत मतदानाची सुविधा इजीएममध्ये सुध्दा उपलब्ध करण्यात येईल आणि ज्या सभासदांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे अगोदर त्यांचे मतदान केलेले नाही त्यांना इजीएममध्ये त्यांचा हक्क वापरणे शक्य होईल. ज्या सभासदांनी इजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे त्यांचे मतदान केलेले आहे ते सुध्दा इजीएमला हजर राहू शकतात परंतु पुन्हा त्यांचे मतदान करण्यासाठी हक्कदार नाहीत.

ज्या व्यक्तीने इजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे भाग संपादित केले आहेत आणि कंपनीचे सभासद बनले आहेत आणि कट ऑफ तारखेस भाग धारण केलेले आहेत ते evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवून लॉगईन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकतात. तथापी त्या व्यक्तीने दूरस्थ ई-मतदानाकरिता एनएसडीएलकडे अगोदर नोंदणी केली असल्यास ते मतदान करण्यासाठी विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतात.

दूरस्थ ई-मतदानाशी संबंधित तपशिलाकरिता कृपया इजीएमच्या सूचनेचा संदर्भ घ्यावा. ई-मतदानाशी संबंधित कोणत्याही चौकशीकरिता कृपया फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्यूज) चा संदर्भ घ्यावा आणि सभासदांकरिता दूरस्थ ई-मतदान युजर मॅन्युअल www.evoting.nsdl.com च्या "डाऊनलोड सेक्शन" मध्ये उपलब्ध आहे किंवा टोल फ्री क्र. १८००-२२२-९९० वर फोन करावा. ई-मतदान सुविधेशी संबंधित कोणतीही तक्रार असल्यास कृपया श्री. राजिव रंजन, असिस्टंट मॅनेजर, एनएसडीएल, ४ था मजला, 'ए' विंग, ट्रेड वर्ल्ड, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३, ई-मेल: rajivr@nsdl.co.in किंवा evoting@nsdl.co.in, फोन क्र. ०२२ २४९९ ४७३८ यांना संपर्क करावा.

सभेला हजर राहून मतदान करण्यासाठी हक्कदार असलेल्या व्यक्ती व्यक्तिशः किंवा प्रतिपत्री व्यक्ती/प्राधिकृत प्रतिनिधींमार्फत मतदान करू शकतात मात्र सभेला हजर राहून मतदान करण्यासाठी हक्कदार असलेल्या व्यक्तींने यथायोग्य सही केलेले विहित प्रपत्र/ ॲथोरायझेशनमधील सर्व प्रतीपत्री प्रपत्र सभेपूर्वी किमान ४८ तास अगोदर कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

टाटा केमिकल्स लिमिटेड करिता
सही/-
राजिव चंदन
जनरल कौंसेल आणि कंपनी सेक्रेटरी

ठिकाण : मुंबई
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०१६